BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

दारिद्रय, असमानतेचे निर्मुलन आणि सर्वसमावेशक विकासात सामाजिक न्यायाची भूमिका – एक अभ्यास

प्रा. ई. एस. गेडाम.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नवापूर, जि. नंदुरबार.

सहाय्यक प्राध्यापक - विभाग प्रमुख - राज्यशास्त्र विभाग

Gmail - eknathgedam@gmail.com

***प्रस्तावना** - दारिद्र्य व असमानतेचे निर्मूलन होणे हे देशाच्या हितासाठी अत्यंत आवश्यक आहे. दारिद्र्य फक्त आर्थिक टंचाईमुळेच निर्माण होते असे नाही तर अनेक प्रकारच्या संधी नाकारल्यामुळे देखील दारिद्र्य निर्माण होत असते. भारतीय संविधानाच्या माध्यमातून दारिद्र्य आणि असमानता या घटकाला कायदेशीर हद्दपार करण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून करण्यात येत आहे, दारिद्र्य आणि संधीची समानता नाकारणे या आधारावर शोषण होताना दिसत आहे, त्यासाठीच सामाजिक न्यायाच्या तत्वाच्या माध्यमातून दारिद्र्य आणि असमानतेचे निर्मूलन करणे काळाची गरज आहे. सामाजिक न्यायाच्या माध्यमातून सर्व समाजाला विकासाच्या प्रक्रियेमध्ये आणणे, सर्वांना समानसंधी बहाल करणे, पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि सर्व समावेशक विकास साध्य करणे हाच खरा सामाजिक न्यायाचा उद्देश आहे.विकासाच्या संकल्पना देशाच्या हितासाठी आणि देशांतर्गत नागरिकांसाठी फायदेशीर ठरताना दिसत आहे. त्यामुळेच देशांमध्ये जे विषमतावादी तत्त्व आहेत त्यांना हद्दपार करणे आणि देशाला मुख्य विकासाच्या प्रक्रियेमध्ये आणणे हाच खरा मुख्य उद्देश सामाजिक न्यायाचा आपणास दिसतो. संविधानिक अधिकाराच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलन व असमानतेच्या तत्वाचे उच्चाटन आणि देशाच्या अंतर्गत सर्व जाती, धर्माच्या, पंथाच्या, भाषेच्या लोकांचा विकास साध्य करणे हेच खरे राजकीय व्यवस्थेचे कर्तव्य असायला पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित करता येईल. वरील संशोधन लेखाच्या माध्यमातून दारिद्र्याची संकल्पना व असमानतेचे तत्व आणि सर्वसमावेशक विकास या दृष्टिकोनातून चिकित्सक पद्धतीने विषयाची मांडणी केली आहे.

***संशोधनाचे उद्दिष्टे** - १) दारिद्र्य निर्मूलनात सामाजिक न्यायाची भूमिका अभ्यासणे.

२) असमानता निर्माण करणाऱ्या घटकांचा शोध घेणे.

३) व्यक्ती विकासाला बाधा निर्माण होणाऱ्या घटकांचा शोध घेणे.

४) व्यक्ती विकासामध्येच सर्व समावेशक संकल्पना अंतर्भूत आहे हे स्पष्ट करणे.

*** विषय विवेचन** - देशात एकीकडे धान्याचा प्रचंड साठा आहे आणि दुसरीकडे भूकबळी आणि कुपोषण अस्तित्वात आहे. याचा अर्थ ग्रामीण भागातील जनतेत पोटापुरते अन्न विकत घेऊन ते खाण्याची शक्ती उरलेली नाही, याचा दुसरा अर्थ असा होतो की या जनतेची क्रयशक्ती पूर्णपणे घटलेली आहे. ही क्रयशक्ती घटली याचे कारण पोटापुरते लागणारे अन्न खरेदी करण्यासाठी आवश्यक असणारा पैसा त्यांच्या हाती आणून देऊ शकेल असा रोजगार त्यांना उपलब्ध नाही. रोजगार नाही म्हणून पैसा नाही, आणि पैसा नाही म्हणून भूक भागविता येत नाही. भूक भागविता येत नाही म्हणून भूखबळी होणे किंवा कुपोषित राहणे, या वाचून अन्य पर्याय उरत नाही. असे हे दुष्टचक्र आहे. हे दुष्टचक्र भेदण्यासाठी ग्रामीण भागात रोजगार निर्माण करून तेथील जनतेची क्रयशक्ती वाढवणे आवश्यक आहे. ग्रामीण भागाचा आणि दुर्गम भागाचा कायापालट

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

करण्यासाठी शासनाने प्रभावी योजना राबविणे आवश्यक आहे. त्यामध्ये जमिनीचे पुनर्रचना करणे, जमिनीच्या मालकी हक्काची फेररचना करण्याचे अनेक कायदे आपण केलेत, त्याचीही पुरेपूर आणि प्रभावी अशी अंमलबजावणी व्हावी असा प्रयत्न शासनाने करणे आवश्यक आहे, पण त्याची प्रभावी अशी अंमलबजावणी आजपर्यंत झालेली दिसत नाही, हे या देशाचे दुर्दैव आहे.१ ग्रामीण भागातील दारिद्र्य आणि असमानता दूर करण्यासाठी शासनाने रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री विकास योजना ,इंदिरा गांधी आवास योजना, निराधार योजना इत्यादी योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील दारिद्र्य व असमानता कमी करण्यात महत्त्वाचे योगदान दिल्याचे स्पष्ट होताना दिसत आहे.

***कामगारांना** अभिप्रेत असलेल्या राज्यात सर्वांना समान संधी असली पाहिजे व प्रत्येक व्यक्तीला तिच्या विकासासाठी आवश्यक त्या सर्व सवलती शासनाने दिल्या पाहिजेत. मानवाला सर्वनाशापासून मुक्त करावयाचे असेल तर नव्या व्यवस्थेचा स्वीकार करण्याशिवाय अन्य मार्ग नाही. नाझी तत्त्वज्ञानात वांशिक उच्चनीचतेचे तत्व हे सर्वात महत्त्वाचे तत्व आहे. जर्मन वंश हा जगातील सर्वात श्रेष्ठ आहे, असे नाझी समजतात. इतर वर्णीयांना ते जर्मन माणसापेक्षा खालच्या दर्जाचे समजतात, एवढेच नव्हे तर भारतातील तपकिरी वर्णाचे लोक हे जर्मन व श्वेतवर्णीयांचे गुलाम म्हणून जगण्याच्याच योग्यतेचे आहेत असे त्यांना वाटते. त्यांना शिक्षण देण्याची गरज नाही. राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य त्यांना देता कामा नये असे नाझीचे मत आहे. हिटलरने आपल्या माईन कॉन्फ या आत्मचरित्रपर ग्रंथात भारतीयांना शिक्षण व राजकीय स्वातंत्र्य दिल्याबद्दल ब्रिटिशांचा अत्यंत कठोरपणे धिक्कार केला आहे, ही गोष्ट सर्वांना परिचित आहे. नाझी तत्त्वज्ञान हे भारतीय स्वातंत्र्याला व मुक्ततेला फार मोठे संकट आहे.२ मानवी असमानता हे दारिद्र्याचे मूळ कारण आहे आणि दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी समाजामध्ये असलेली असमानता नष्ट करणे आवश्यक आहे. म्हणूनच नाझी तत्त्वज्ञानाने निर्माण केलेली असमानता जोपर्यंत नष्ट होत नाही तोपर्यंत सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पना प्रत्यक्ष राबवता येणे कठीण आहे, हे यावरून स्पष्ट होते.

***सामाजिक व आर्थिक विकास -** स्वराज्य व सुराज्याचे स्वप्न खरे होण्यासाठी देशाचा सामाजिक व आर्थिक विकास साधने अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्याकडे मुबलक शेती आहे, पाणी आहे, श्रम आहे, खनिज संपत्ती आहे आणि भांडवल देखील आहे परंतु त्यांचे योग्य असे नियोजन झालेले नाही. संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सामाजिक व आर्थिक न्यायाची संविधानकर्त्यांची संकल्पना, त्यासाठी करावयाचे उत्पादन साधनांचे नियोजन, वितरण आणि विनियोग करून संपूर्ण समाजाचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी आवश्यक असे मार्गदर्शन करण्यात आले आहे. आपण मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारलेली आहे. भूमीवर व्यक्तिगत मालकी असली तरी राज्यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार भूमी सुधार कायदे करून जमीन धरणा पद्धतीत सुधारणा करण्याचे ठरवण्यात आले. भूमीसुधार हा विषय राज्यशासनाच्या अधीन आहे. जवळपास सर्वच राज्यशासनांनी आपापल्या भूमीसुधार विषयक योजना आखून कायदे केलेले आहेत. त्यामध्ये कुळाविषयी कमाल मर्यादा, जमीन इनामदारी विषयी कायदे अस्तित्वात आहे. जमीनसुधार विषयक सर्व कायदे न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या बाहेर ठेवण्यासाठी अनुसूची नऊ मध्ये टाकण्यात आलेले आहेत. त्यात आज एकूण २४८ कायदे असून त्यातील बहुतेक कायदे जमीन सुधाराशी संबंधित आहेत, परंतु सदर कायदे योग्य रीतीने अमलात आणले जात नाही. आपल्या देशात मजूर अधिक संख्येने व स्वस्तात उपलब्ध आहेत. मात्र श्रमविषयक कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणी अभावी त्यांना दारिद्र्यात जीवन जगावे लागते. जागतिकीकरणाच्या या काळात तर त्यांना नोकरीची काहीही हमी किंवा निश्चिती राहिली नाही. अनुच्छेद 38 (2) अनुसार राज्य हे विशेषतः केवळ व्यक्ती व्यक्तीमध्येच नव्हे तर निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या किंवा निरनिराळ्या व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकसमूहामध्ये देखील उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करील. अनुच्छेद 39 नुसार राज्य हे विशेषतः पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखतील - (क) उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री व पुरुष नागरिकांना सारखा असावा. (ख) सामूहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी. (ग) स्त्री व पुरुष या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे. वरील सर्व लोककल्याणकारी कार्यक्रम

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

राबविण्यासाठी संविधानाने राज्यांना आदेशित केलेले आहे. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वामधून समाजवाद स्वीकारून, लोकशाही मार्गाने ती तत्वे अमलात आणण्यासाठी संघर्ष करणे आवश्यक आहे.३ समाजातील दारिद्र्य कमी करण्यासाठी भारताच्या संविधानामध्ये संविधानिक उपाय योजनेची तरतूद आहे. राज्यशासनाने त्यावर आधारित कायदे करून आणि प्रभावी पद्धतीने अंमलबजावणी करून दारिद्र्य निर्मूलन करणे काळाची गरज आहे. समाजामध्ये असलेली असमानता हे देखील व्यक्ती विकासाला बाधक आहे. भारताच्या संविधानामध्ये असमानतेला कोणत्याही प्रकारचा आधार नाही, त्यामुळे असमानतेचे निर्मूलन सर्व स्तरातून होणे आवश्यक आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक सर्व स्तरातील असलेली असमानता संविधानिक मार्गाने नष्ट करणे, हे देखील मानवी विकासाच्या प्रगतीचे एक साधन आहे, तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाचा आणि देशातील समाजाचा सर्वसमावेशक विकास साध्य करता येईल.

***लोकशाहीतील एक व्यक्ती एक मूल्य हे तत्व प्रत्यक्षात यायचे असेल तर**, त्याचबरोबर समाजातील आर्थिक व्यवस्थेची रचना व स्वरूप निश्चित करणे गरजेचे आहे. घटनात्मक कायद्याद्वारे समाजातील आर्थिक व्यवस्था आणि राजकीय व्यवस्था दोन्ही निश्चित करण्याचे धाडसी पाऊल आपण उचलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. डॉ. आंबेडकरांना देशाच्या आर्थिक बाबींमध्ये राज्यसंस्थेचा प्रभावी हस्तक्षेप हवा होता. त्यांनी वारंवार असे मांडले की खाजगी उद्योगांचे आर्थिक निर्णय नेहमीच व्यक्तिगत नफ्यात अधिकाधिक वाढ करण्याच्या हेतूने प्रेरित असल्याने, त्याद्वारे उच्च आर्थिक वृद्धी साध्य होईल, पण अनेक वेळा असे निर्णय कष्टकरी जनतेच्या आर्थिक सुव्यवस्थेच्या विरोधात जाऊ शकतात, अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी खाजगी उद्योगांच्या अनिर्बंध स्वातंत्र्याला, विशेषता सामान्य व्यक्तीला कोणतीही आर्थिक सुरक्षा व संरक्षणशिवाय दिलेल्या स्वातंत्र्याला विरोध केला. त्यांच्या मते नियोजित अर्थव्यवस्था गरिबांच्या आर्थिक हितसंबंधाची काळजी घेण्यास अधिक समर्थ असेल. त्यांच्या मते कृषी हा राज्याच्या अखत्यारीतील उद्योग व्हावा. त्यांनी सामुदायिक शेतीसाठी एक योजना मांडली होती. डॉ.आंबेडकर यांना राज्य समाजवादाची योजना घटनेचा अंगभूत भाग व्हावा असे वाटत होते. त्यांनी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता व घरबांधणी यासारख्या सामाजिक सेवावर अधिक शासकीय खर्चाचा पुरस्कार केला. भारतातील संघराज्य पद्धतीच्या दृष्टिकोनातून केंद्र व राज्य यांच्यात आर्थिक साधन सामग्रीच्या न्याय वाटपाची त्यांनी शिफारस केली. ४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य समाजवाद निर्माण करण्यासाठी संविधानिक उपाय योजनेचा पुरस्कार केला. शिक्षण, आरोग्य इत्यादी पायाभूत सुविधा या खऱ्या अर्थाने दारिद्र्य निर्मूलन निर्मूलन आणि देशातील असमानता नष्ट करण्यासाठी उपयुक्त आहेत असा विचार त्यांनी मांडला. डॉ .आंबेडकरांचा राज्य समाजवाद हा खऱ्या अर्थाने देशातील संपूर्ण जनतेचा सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिकोनातील एक पाया आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

'तळ्याच पाणी' आता बाटली बंद - मानवाला स्वतःच्या क्षमताच्या विकासासाठी स्वाभिमान, सामाजिक समता आवश्यक आहेच. पण त्यासोबतच भौतिक साधन म्हणजेच दर्जेदार शिक्षण, परवडणारी आरोग्यवस्था, सन्मान जनक रोजगार हे देखील तितकच महत्त्वाच आहे. व्यक्तीला स्वतःच्या आणि कुटुंबाच्या भौतिक, सांस्कृतिक गरजा पूर्ण करण्यासाठी रोजगार आणि उपजीविकेचे साधन असणे गरजेचे आहे. पण या संधी देखील दिवसेंदिवस कमी होताना दिसत आहे सरकारी नोकऱ्यांची संख्या झपाट्याने कमी केली जात आहे. आहे त्या नोकऱ्यांचे कंत्राटीकरण करण्यात येत आहे. राजश्री शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या सामाजिक न्याय व आरक्षणासाठी आयुष्यभर झटले ते धोरणच कमकुवत केले जात आहे. मानवी विकासाची साधनच जर मूठभर लोकांच्या कब्जात असतील तर बहुतांश समाजाच्या विकासाला नेहमीच मर्यादा असतील. देशाची साधन संपत्ती म्हणजे ते विहिरीचं, तळ्याचे पाणी त्याचं न्याय वाटप करण्याची जबाबदारी संविधानाने सरकारवर टाकली आहे आणि सरकार ही जबाबदारी व्यवस्थित पार पाडत आहे की नाही यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी नागरिकांची आहे. आज मानव मुक्तीचा लढा फक्त एका समाज घटका पुरता मर्यादित नसून तो व्यापक आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या मागास समाज घटकांच्या आजच्या प्रश्नावर चर्चा होणे आणि त्यावर संवैधानिक मार्गाने उपाययोजना करणे गरजेचे आहे.५ सामाजिक न्यायाच्या माध्यमातूनच दारिद्र्य व असमानतेच निर्मूलन आणि सर्वसमावेशक

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

विकास निर्माण केल्या जाईल. या देशामध्ये दर्जेदार शिक्षण, उत्तम आरोग्य व्यवस्था आणि सन्मानजनक नोकऱ्या या प्राथमिक गरजा जोपर्यंत नागरिकांच्या पूर्ण होणार नाही, तोपर्यंत कोणत्याही अर्थाने सर्वसमावेशक विकास शक्य नाही आणि तो विकास साध्य करायचा असेल तर सामाजिक न्यायाची संकल्पना प्रस्थापित करावी लागेल.

***वर्तमानाला प्रश्न विचारणे हेच खरे स्मरण** - महात्मा फुले यांची भूमिका अत्यंत मुलगामी होती. त्यांनी विचारले - समाजात विषमता का आहे? जन्मता श्रेष्ठ आणि कनिष्ठ कोणी ठरवले? ज्ञानावर काहींची मक्तेदारी का असावी? धार्मिक विधीच्या नावाखाली मध्यस्थांचे वर्चस्व का निर्माण झाले? शूद्र - अतिशूद्र आणि स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा अर्थ काय आहे? फुले यांनी परिणामावर नव्हे, तर विषमतेच्या संरचनात्मक मुळावर प्रहार केला. त्यामुळे सत्यशोधक समाज ही केवळ सामाजिक सुधारणा करणारी संस्था नव्हती, ती एक प्रकारची पर्यायी ज्ञानव्यवस्था उभारण्याची चळवळ होती. फुले यांचा संघर्ष जन्मआधारित श्रेष्ठत्वाच्या विचारसरणी विरुद्ध होता. महात्मा फुले यांच्या विचारात शिक्षणाला असाधारण महत्त्व आहे. शिक्षण म्हणजे माणसाला स्वतःच्या गुलामगिरीची जाणीव करून देणारे साधन, म्हणूनच शूद्र - अतिशूद्र आणि स्त्रियांना शिक्षण देणे हे त्या काळात सामाजिक सत्तेच्या संरचनेवर केलेले आक्रमण होते. ज्याच्या हातात ज्ञान असते त्याच्या हातात अर्थनिर्णयाची शक्ती असते. फुले यांनी ही बाब फार लवकर ओळखली. त्यामुळे शिक्षण हे मुक्तीचे साधन आहे, हा त्यांचा आग्रह होता. ६ महात्मा फुले यांनी समाजातील दारिद्र्य व विषमता नष्ट करण्यासाठी शिक्षणाला महत्व दिले. कारण शिक्षणामुळेच माणूस तर्कवादी बनतो आणि तर्कवादी माणूसच स्वतःचा सर्वसमावेशक विकास साध्य करू शकतो.

***** मानवी मूल्ये** - आर्थिक मूल्ये ही संपत्ती निर्माण करतात आणि सामाजिक मूल्ये ही तिच्या न्याय वाटपाची खात्री देतात. शिक्षण आणि आरोग्य सुविधा सर्वांना समानतेने उपलब्ध झाल्यास लोकसंख्येचे रुपांतर मानवी भांडवलात होते. आरोग्य सुरक्षा कुटुंबांना गरिबीत ढकलले जाण्यापासून वाचवते. मनरेगा, योजना ही बाजारातील स्पर्धेचा वा मागणीचा विचार करून नव्हे, तर नागरिकांची प्रतिष्ठा राखत साधनसंपत्ती निर्मिती करण्याच्या उद्दिष्टाने राबविण्यात येते. संपत्तीतील मोठी दरी सामाजिक असंतोषाला खतपाणी घालते. हे विचारात घेऊनच घटनेच्या अनुच्छेद 38 आणि 39 मधील मार्गदर्शक तत्त्वामध्ये संपत्तीच्या समान वाटपाची तरतूद केली आहे. सामाजिक जाणीव नसलेली आर्थिक मूल्ये ही धनिकशाही निर्माण करतात, तर आर्थिक स्थिरतेशिवाय असलेली सामाजिक मूल्ये ही देशाला कल्याणकारी योजनांच्या जाळ्यात अडकवतात. सर्वसमावेशक विकासासाठी सामाजिक मूल्यांच्या अधीन राहून आर्थिक प्रगती साधने ही कल्याणकारी राज्यांची संकल्पना साकारणे आवश्यक आहे. आर्थिक प्रगती देशाच्या आर्थिक उत्पन्नाचा हिस्सा वाढवते, परंतु सामाजिक मूल्ये त्याचे न्याय्य पद्धतीने वाटप व्हावे याची काळजी घेतात. रोजगार विरहित वाढ किंवा तीव्र आर्थिक असमानता समाजात असंतोष निर्माण करते. आर्थिक मूल्ये ही देशाला वित्तीय बळ देतात, तर सामाजिक मूल्ये त्याला नैतिक दृष्टी प्रधान करतात. कल्याणकारी व संवेदनशील अर्थशास्त्राचा अवलंब केल्यास खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकास साधता येईल.७ सर्वसमावेशक विकासासाठी तसेच समाजातील दारिद्र्य नष्ट व्हावे, मानवी असमानता हद्दपार व्हावी, यासाठी सामाजिक मूल्यांना प्राधान्य देऊन आर्थिक मूल्ये ठरवणे हेच धोरण शासनाचे असावे.

***उपायोजना** - १) सर्वसमावेशक विकास करण्यासाठी संधीची समानता प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करणे.

२) सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला केवळ कायद्याच्या चौकटीत न ठेवता प्रत्यक्ष संविधानिक नैतिकेच्या परिप्रेक्षातून सामाजिक न्यायाची उभारणी करणे.

३) दारिद्र्य व असमानतेचे निर्मूलन करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेबरोबरच संसाधन साधनाचे न्यायिक पद्धतीने वितरणात्मक व्यवस्था तयार करणे.

४) स्वराज्य व सुराज्य प्रत्यक्षात आणण्यासाठी सामाजिक व आर्थिक लोकशाही शक्य तितक्या लवकर प्रस्थापित करणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

५) असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या वेतन व आरोग्याच्या संदर्भात शासनाने प्रभावी उपाययोजना करणे.

***निष्कर्ष** - १) आर्थिक असमानतेमुळे दारिद्र्य निर्माण होत नाही, तर अनेक प्रकारच्या संधी नाकारल्यामुळे दारिद्र्याची समस्या तीव्र बनत आहे.

२) सामाजिक न्यायाच्या माध्यमातूनच दारिद्र्य व असमानतेचे निर्मूलन शक्य आहे.

३) सर्वसमावेशक विकासात लोकांची क्रयशक्ती वाढवण्यासाठी शासन पुरस्कृत रोजगार निर्मिती होत आहे .

४) उत्पादन साधनाचे नियोजन, वितरण आणि विनियोग संविधानिक नियमानुसार होताना दिसत नाही.

५) सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक असमानता संवैधानिक मार्गातील अडथळा आहे.

***संदर्भ -** १) भागवत विष्णू- जागतिकीकरण नवीन गुलामगिरी - समता प्रकाशन, नागपूर - २००७ पेज नं. ७४, ७५

२) गायकवाड प्रदीप - कामगार चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख - समता प्रकाशन, दीक्षाभूमी नागपूर २०१२, पेज नं. ९०.

३) क्षीरसागर आर. के. - आजच्या समस्या आणि भारतीय संविधान, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद २०१० पेज नं. २७, २८,२९.

४) मुणगेकर भालचंद्र - भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित - एक आंबेडकरी दृष्टिकोन, सुगावा प्रकाशन पुणे, २०१२, पेज नं. २१,२२.

५) रांजणकर निखिल दगडू - 'तळ्याचे पाणी' आता बाटलीबंद - लेख, दैनिक लोकसत्ता वृत्तपत्र, दि. २५ मार्च २०२६, पेज नं. ६.

६) वाघ अरुण - वर्तमानाला प्रश्न विचारणे हेच खरे स्मरण - लेख, दैनिक वृत्तपत्र लोकसत्ता, दि. २४ सप्टेंबर २०२६, पेज नं. ५.

७) शहा रोहिणी - मानवी मूल्ये - लेख, करियर वृत्तांत, दैनिक लोकसत्ता वृत्तपत्र, दि. २१ ऑगस्ट २०२६, पेज नं. ८.